# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)**

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ E-mail :- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था/3945 /२०२४ दि. 30 /०९/२०२४

## अधिसूचना

### जीवनसाधना गौरव पुरस्कार - २०२४

दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२४ ला विद्यापीठाच्या तेराव्या वर्धापन दिनाच्या निमित्याने जीवनसाधना गौरव पुरस्कार प्रदान करण्यासाठी शोध समितीने शिफारस केलेल्या सहा नावांमधून एका व्यक्तीची जीवनसाधना गौरव पुरस्कारासाठी निवड करण्याकरीता त्रिसदस्यीय समितीचे गठन व्यवस्थापन परिषदेमार्फत करण्यात आले. सदर समितीची दि. २७/०९/२०२४ रोजी सभा आयोजित करण्यात आली होती.

**सदर समितीने डॉ. शरद सालफले, विदर्भ वनवासी कल्याण, चंद्रपूर यांची ज्येष्ठता आणि त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन विशेषत: आरोग्य क्षेत्रातील त्यांचे कार्य लक्षात घेऊन, गोंडवाना विद्यापीठाचा जीवनसाधना गौरव पुरस्कार- २०२४ साठी डॉ. शरद सालफले, विदर्भ वनवासी कल्याण, चंद्रपूर यांच्या नावाची शिफारस केलेली आहे.**

विद्यापीठाचे १३वे वर्धापन दिन दिनांक ०२ ऑक्टोंबर, २०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे संपन्न होणार आहे. त्याअनुषंगाने **डॉ. शरद सालफले, विदर्भ वनवासी कल्याण, चंद्रपूर यांना जीवनसाधना गौरव पुरस्कार- २०२४ या** पुरस्कारांचे वितरण हे कार्यक्रमादरम्यान मान्यवरांचे हस्ते प्रदान करुन गौरविण्यात येणार आहे.

मा. कुलगुरू महोदयांचे मान्यतेने

(डॉ. अनिल हिरेखन)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**प्रतिलिपी माहितीकरीता:-**

१) मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) सर्व प्राधिकरणांचे सन्माननीय सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४) मा. प्राचार्य, सर्व घटक व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी वर्गास तसेच विद्यार्थ्यांना सदर परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.
५) मा. सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी आपल्या अधिनस्त शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी, तसेच विद्यार्थ्यांना सदर परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.
६) डॉ. प्रिती काळे, सहा. प्राध्यापक तथा समन्वयक, पुरस्कार, मोमेंटो सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ तयार करणे व वितरण करणे समिती यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
७) सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदर अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.